जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05-01-2020

तरुण भारत

# विद्यापीठात आविष्कार संशोधन महोत्सव बुधवारी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ स्तरावरील 'आविष्कार' या संशोधन महोत्सवाचे आयोजन विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात बुधवार ८ जानेवारी रोजी करण्यात आले आहे. महोत्सवात विद्यापीठाशी सलग्नित महाविद्यालये व विद्यापीठाचे अधिविभागातील विद्यार्थी व शिक्षक संशोधन सादर करणार आहेत. महोत्सवामध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी, एम फिल/ पी. एच.डी.साठी प्रवेशित विद्यार्थी, एम फिल/ पी.एच.डी. साठी प्रवेशित परंतु एम.फिल/पीएच.डी पदवी प्राप्त न केलेले विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक अशा गटात स्पर्धा होणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी, संशोधनाची परंपरा निर्माण व्हावी, नाविण्यपूर्ण व सृजनशील विचार निर्माण व्हावेत, शैक्षणिक गुणवत्तेस व्यासपीठ मिळावे, शैक्षणिक संस्था, संशोधन व विकास संस्था आणि उदयोग क्षेत्रामध्ये सुसंवाद वाढावा या हेतूने आविष्कार या संशोधन महोत्सवाचे दरवर्षी आयोजन केले जाते. कोणत्याही शाखेत शिकत असणारा विद्यार्थी वरील कोणत्याही शाखेअंतर्गत आपले संशोधन सादर करू शकतो. या विद्यापीठस्तरीय फेरीतून निवडलेले विद्यार्थी मुंबई येथे २८ ते ३० जानेवारी रोजी आयोजित राज्यस्तरीय महोत्सवात भाग घेतील.

# विद्यापीठात मंगळवारी कार्यशाळा

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने मंगळवारी (दि.७) दुपारी १२ वाजता डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानांतर्गत 'महात्मा गांधींचे राजकीय नेतृत्व' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये करण्यात आले आहे. कार्यशाळेत हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठाचे माजी प्रा. डॉ. न. गो. राजूरकर यांचे व्याख्यान होणार आहे. ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अशोक चौसाळकर हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत, अशी माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी दिली.

पुढारी

# मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

भाषा संवर्धन पंधरवड्याची सुरुवात ७ जानेवारी रोजी ग्रंथदिंडी आणि पारंपरिक वारकरी भजनाने होईल. मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे व मान्यवरांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन होईल. दि. ९ रोजी डी. आर. माने महाविद्यालय, कागल येथे युनिकोड व विकीपीडिया कार्यशाळा होणार आहे. दि. १० रोजी नाईट कॉलेज कोल्हापूर येथे प्रमाण मराठी लेखन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

१३ जानेवारी रोजी 'लेखक-विद्यार्थी संवाद' शाहू स्मारक भवनाच्या मिनी सभागृहात सायंकाळी ६ वाजता होईल. याच दिवशी सकाळी ११ वाजता मराठी विभागात प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांच्या हस्ते किरण गुरव यांच्या 'जुगाड' कादंबरीची द्वितियावृत्ती आणि श्वासोश्वासांच्या मध्यंतरातील कविता हा रघुनाथ कडाकणे यांच्या कवितासंग्रहाचे एकत्रित प्रकाशन करण्यात येणार आहे. दि. १६ रोजी 'मी आणि माझी कविता' हा कवितांचा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे, मराठी विगाप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

पंधरवड्यानिमित्त मराठीतील ख्यातनाम समीक्षक म. सु. पाटील यांच्या नावाने या वर्षीपासून विद्यापीठातर्फे 'म. सु. पाटील समीक्षा पुरस्कारा'ची सुरुवात करण्यात आली आहे. पहिल्या पुरस्काराचे वितरण पुरस्कार विजेते समीक्षक सुधीर रसाळ यांना ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते दिला जाणार आहे. हा पुरस्कार सोहळा शाहू सिनेट सभागृहात दुपारी ४ वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

# आविष्कार महोत्सवाचे बुधवारी विद्यापीठात आयोजन

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात बुधवारी (ता. ८) आविष्कार संशोधन महोत्सव २०१९-२० चे आयोजन केले आहे. महोत्सवात मनाव्य शास्त्रे, विज्ञान, अभियांत्रिकी, कृषी विभागातील संशोधन, प्रकल्प पाहायला मिळणार आहेत.

या महोत्सवात निवडले जाणारे प्रकल्प विद्यापीठस्तरीय फेरीतून निवडलेले विद्यार्थी मुंबई येथे २८ ते ३० जानेवारी या कालावधीत होणाऱ्या राज्यस्तरीय महोत्सवासाठी पाठवले जातील. शिवाजी विद्यापीठ स्तरावरील 'आविष्कार' या संशोधन महोत्सवाचे आयोजन विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात केले आहे. २०१९-२० या वर्षीच्या आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्याचा मान विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागास मिळाला आहे. महोत्सवात पदवी, पदव्युत्तर पदवी,



एम.फिल., पी.एच.डी.साठी प्रवेशित विद्यार्थी, परंतु एम.फिल., पीएच.डी पदवी प्राप्त न केलेले विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक असे प्रवेशाचे चार स्तर आहेत. विद्यार्थी व शिक्षक पुढील सहा शाखांत संशोधन प्रकल्प सादर करू शकतात. मानव्यशास्त्रे, भाषा व ललित कला, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा, शुद्ध विज्ञान, शेती व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषधनिर्माण, या व्यतिरिक्त कोणत्याही शाखेत असणारा विद्यार्थी वरील कोणत्याही शाखेअंतर्गत संशोधन सादर करू शकतो.

# शिवाजी विद्यापीठाला क्रिकेटमध्ये मानांकन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापू, ता. ४ : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष गट क्रिकेट स्पर्धेत गुजरात विद्यापीठाचा ६४ धावांनी पराभव करून शिवाजी विद्यापीठाचे मानांकन मिळाले. ग्वाल्हेर येथे ही स्पर्धा सुरू आहे.

आज शिवाजी विद्यापीठाच्या क्रिकेटमध्ये इतिहास घडवत सलग पाचव्या सामन्यांमध्ये विजय मिळवताना गुजरात विद्यापीठ विरुद्ध प्रथम फलंदाजी करताना करण सांगावकर ३४ धावा, प्रथमेश बाजरी २५ धावा यांच्या फलंदाजीच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाने १५० अशी माफक धावसंख्या उभी केली. उत्तरादाखल खेळताना गुजरात विद्यापीठाचा डाव केवळ ८६ धावांत गुंडाळून शिवाजी विद्यापीठाने त्यांना ६४ धावांनी हारवत विजय मिळवला.

यात निखिल कदम याने केवळ चार धावा देऊन दोन गडी बाद करत विजयात मोलाचा वाटा उचलला. संघासोबत प्रशिक्षक म्हणून डॉ. रोहित पाटील व संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. खिलारे गेले आहेत.



**कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत पुरुष गटात नामांकन मिळवलेला शिवाजी विद्यापीठाचा क्रिकेट संघ. सोबत प्रशिक्षक डॉ. रोहित पाटील व संघ व्यवस्थापक प्रा. खिलारे.**